# छंद पुष्परचनेचा - १०

मुक्तरचना करताना एक वेगळाच आनंद अनुभवता येतो. आपल्या आवडीची व सहज मिळणारी फुले, पाने त्यांचे रंग, पुष्पपात्र, केव्हातरी आठवणीने बाळगून ठेवलेले गवत, काड्या, वाळलेली पाने किंवा एखाद्या झाडाचे जपून वाळवून ठेवलेले खोड असे काही वापरुन मनाजोगती केलेली फुलापानांची मांडणी निर्मितीचा एक वेगळाच अनुभव देऊन जाते. पानाफुलांची उंची, कोन याचे फारसे बंधन नसल्यामुळे कल्पनेचा मुक्त वापर करता येतो.

कित्येक वेळा पुष्पपात्र न वापरता अनेक मुक्तरचना केल्या जातात. साध्या बाटल्या, मग, पाईपचे तुकडे, जाळी, एखादा रंगीत पुठ्ठा किंवा वेताच्या चटईचा तुकडा अशा अनेक गोष्टींचा उपयोग करता येतो.



फोटो १

पुष्परचना १ मध्ये जाड हँडमेड पेपरपासून पंखा बनवला आहे. त्या पंख्याच्या मध्यभागी एका छोट्या प्लॅस्टिक डब्यात फ्लोरल स्पंज ओला करुन बसविला आहे व त्यामधे रचना केली आहे. पंखा सौम्य रंगाचा असल्यामुळे गडद रंगाची फुले त्यासमोर उठून दिसत आहेत. लाईन वर्कसाठी वेलाच्या फांद्यांचा उपयोग केला आहे.

पुष्परचना २ मध्ये हँडमेड पेपरचे दोन पंखे एका पुढे एक असे वापरले आहेत. दोन्ही पंख्यांपुढे वापरलेल्या लांब वेलीच्या फांद्यांमुळे रचना एकजीव झाली आहे. अशाप्रकारे पंख्यांची संख्या वाढवून मोठी रचना करता येते.



फोटो २

पुष्परचना ३ मध्ये वेगवेगळ्या आकाराचे अनेक लहान मोठे पंखे वापरले आहेत. लाल एन्थोरियमचा प्रामुख्याने यात वापर केला आहे.



फोटो ३



पुष्परचना ४ मध्ये चटईच्या तुकड्यावर जर्बेराची फुले व जांभळ्या रंगाचे ऑर्किड लावून रचना केली आहे. ही रचना भिंतीवर टांगता येते. चटईच्या मध्यभागी फ्लोरल स्पंज प्रथम तारेने बांधून घ्यावा व त्यावर फुले लावावीत. रचना पूर्ण झाल्यावर स्पंज दिसणार नाही याची काळजी घ्यावी.

फोटो ४

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

**इकेनोबो इकेबाना, न्यूयॉर्क चॅप्टर**

asdssd@gmail.com